पैगंबर मुहम्मद (स.)
प्रेम, दया, करुणासागर

लेखक
साने गुरुजी

संकलक
अता मुहम्मद

प्रास्ताविक

साने गुरुजींच्या 'इस्लामी संस्कृती' या ग्रंथातून पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवनचरित्र अगदी संक्षिप्त अशा स्वरूपात संकलित करण्यात आले आहे. उद्देश असा की इस्लाम व पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबद्दल त्यांच्या मनात असलेला आदरभाव व श्रद्धा ही लोकांसमोर यावी व थोडक्यात पैगंबरांच्या स्वीकृत कार्याविषयीची जाणीव व्हावी. कारण धावपळीच्या या जीवनामध्ये मोठमोठे ग्रंथ वाचण्यासाठी वेळ काढणारे लोक फारच कमी असतील?

साने गुरुजींच्या लिखाणातून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर असलेली अपार श्रद्धा, अचल विश्वास व प्रेमातून ते फार काही बोलून जातात. असे वाटते की जणू पैगंबरांच्या जीवनव्यवस्थेसमोर त्यांनी स्वत:ला समर्पित केले असावे. त्यांचे गुणगान गाताना ते लिहितात,

"वास्तविक पैगंबर मुहम्मद (स.) यांचा किती प्रेमळ स्वभाव! अपरंपार करुणेचे ते सिंधु होते. कोठेही कुणी दु:खी दिसला तर ते द्रवत, त्यांचे डोळे भरून येत. एखादा अनुयायी मेला, मुले मेली तर त्यांचे डोळे भरत. अशा त्या कारुण्यमूर्तीला परिस्थितीमुळे हाती शस्त्र धरावे लागले! स्वत:च्या लोकांच्या संरक्षणासाठी, बाह्य व्यवस्थेतील नवराष्ट्राच्या संरक्षणासाठी ते संघटित सेना उभारू लागले.

त्या प्रेमसिंधुला परिस्थितीमुळे कठोर व्हावे लागे. वास्तविक त्यांचे जीवन प्रार्थनामय होते, प्रभुमय होते. साधा आहार, झोपायला कठीण चटई, फाटके कपडे व तुटलेल्या वाहना शिवणे! ते वैराग्य, ती अनासक्ती, ती क्षमा, ती ईशपरायणता, ते हिमालयाचे धैय, ती समुद्राची गंभीरता, ती निरपेक्ष दया, ती सरलता, कोठे पाहाल हे गुण? समुद्राच्या तळाशी मोठे मोती सापडतात. महात्म्यांजवळच असे गुण सापडतात." (इस्लामी संस्कृती)

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरलेल्या पवित्र कुरआनबद्दल ते म्हणतात, "यापेक्षा मोठा चमत्कार दुसरा असूच शकत नाही."

ते नेहमी सांगत, "देवाच्या शब्दांचा मी संदेशवाहक. मी पाईक. तो मला वदवितो, मी बोलतो. माझ्याद्वारा प्रभु आपला संदेश देत आहे." पैगंबर मुहम्मद (स.) मानवांच्या पूजेविरूद्ध होते. ईश्वरासमोर अत्यंत नम्रपणे व सरळपणे ते उभे आहेत. अत्यंत साधेपणा त्यांच्या जीवनात होता. अत्यंत भावनामय प्रसंगीही अहंता त्यांना शिवत नसे. केवळ मधुर कृतज्ञता व नम्रता त्यांच्या हृदयात भरलेली असे. पैगंबर

मुहम्मद (स.) एके ठिकाणी म्हणतात :

"दयाळू परमकृपाळू अल्लाहच्या नावाचा जयजयकार असो. या पृथ्वीवर वा त्या स्वर्गात जे जे आहे, ते सारे अल्लाहची स्तुती करतात. सारे चराचर त्या प्रभुचे गुणगान करीत आहे. तो अल्लाह पवित्र आहे. अत्यंत शक्तिमान आहे. सर्वज्ञ आहे. तो एक आहे. अद्वितीय आहे. स्वतःची सामक्षा दाखविण्यासाठी अज्ञानी अरबांत त्याने पैगंबर पैदा केला आहे. अरबांना धर्मग्रंथ व ज्ञान देण्यासाठी, विशुद्ध करण्यासाठी त्याने पैगंबर पाठविला आहे. अरब पूर्वी अज्ञानात होते; परंतु अल्लाहची दया सर्वांठायी आहे. ती मुक्त आहे. इच्छा त्याची असेल तेथे तो आपली दया पाठवितो. अल्लाह परम दयाळू आहे आणि त्या अल्लाहचे चमत्कार या निसर्गात सर्वत्र भरून राहिले आहेत. पाहा, आसमंतात पाहा. हे आश्चर्यमय जगत पाहा. पाहा हे चंद्र, सूर्य, तारे, अनंत निळ्या आकाशात कसे नियमितपणे आपल्या गतीने जात आहेत. या विश्वातील व्यवस्था पाहा, कायदा पाहा, पद्धती पाहा. सुकलेल्या धरित्रीला हिरवीगार करणाऱ्या या पावसाच्या सरी बघा. कसे मोत्यासारखे हे जीवनदायी थेंब आणि प्रचंड महासागरावर डौलाने जाणारी ती गलबते पाहा. मानवांचा फायद्याचा असा माल नेतात, आणतात आणि ही खजुराने लादलेली झाडे पाहा. ती ताडगोळ्यांनी भरलेली ताडांची झाडे पाहा.

"अशी ही महान सृष्टी त्या तुमच्या दगडाधोंड्यांतील देवाने का निर्मिली? त्या लाकडी मूर्तींनी का निर्मिली? तुम्हाला चमत्कार हवे आहेत. जेथे पाहाल तेथे चमत्कार! सारी सृष्टी अल्लाहच्या सामक्षांनी भरलेली आहे. हे शरीरच पाहा. किती व्यवस्थित व सुंदर. आश्चर्यकारक गुंतागुंतीने भरलेले. परंतु कसे दिसते. आणि दिवसरात्रीची ही अभंग शाश्वत जोडी पाहा. जीवनमरणही पाहा. तुम्ही झोपता व जागे होता हाही चमत्कार नाही? अल्लाहने जे विपुल दिले आहे ते जमवावे अशी तुम्हाला इच्छा होते. भरलेले मेघ आणणारे वारे, अल्लाहच्या करुणेचे जणू ते अग्रदूत सृष्टीतील विविधतेमधील मेळ पाहा, त्यांच्यातील एकता पाहा. मानवजातीतही विविधता आहे व सदृशता, एकताही आहे. फुले, फळे, हे प्राणी, मानव या सर्वांवरून, या चराचर सृष्टीवरून कोणीतरी एक सर्वश्रेष्ठ महान अल्लाह आहे असे नाही का दिसत?"

असे पैगंबर मुहम्मद (स.) सांगत, विचारीत. चमत्कारावर भर न देता ते बुद्धीवर भर देतात. विचाराला चालना देतात. भोळसटपणावर जोर देणारे ते नव्हते. प्रज्ञेचा डोळा त्यांना प्रिय होता. बुद्धीचा महिमा ते जाणत. पैगंबरांना ही सारी सृष्टी अल्लाहचे अस्तित्व पुकारणारी असे वाटे. सर्वत्र ईशचमत्कार! सारी सृष्टी अल्लाहचा महिमा जणू मुक्याने गात आहे,

"जेव्हा प्रत्येक पानात। ध्वनी प्रत्येक निर्झरी

सर्वत्र घुमते वाणी। वाऱ्यावर धरेवरी
निरभ्र गगनी आहे। महान् पूरामधे असे
सर्वत्र ईश्वरी वाणी। नावेक न विसावते।।''

अद्वितीय केवळ एक अशा अल्लाहचा हा आचार्य सृष्टीचाही आचार्य आहे. त्या एकेश्वराचा हा पैगंबर सृष्टीचाही पैगंबर आहे. विश्वात सर्वव्यापी नियम आहे, व्यवस्था आहे, ऋतसत्य आहे, एक संकल्पशक्ती, नियामक, विश्वशासक, विश्वमार्गदर्शक अशी आहे, असे पैगंबर सांगत आहेत आणि सर्वांत मोठा चमत्कार कोणता? पैगंबर मुहम्मद (स.) सांगतात, ''निसर्गाची, सद्सद्विवेकबुद्धीची, भविष्यासंबंधीची जी दैवी सत्ये संस्फूर्त वाणीने सांगितली गेली, ज्यांचे हे कुरआन बनले, त्या कुरआनहून अधिक मोठा चमत्कार कोणता?'' पैगंबर मुहम्मद (स.) विचारतात, ''अरे अश्रद्धावंतांनो! तुमच्या या सामान्य भाषेत जगातील असा अद्वितीय ग्रंथ प्रकट व्हावा, ज्यातील लहानसा भागही सोन्याने मढवून ठेवलेल्या तुमच्या सर्व पद्यांना व गीतांना लाजवील, असे हे कुरआन - त्या ईश्वराच्या विश्वव्यापक करुणेची मंगल वार्ता देणारे, अहंकारी घमेंडी लोकांना, जुलमी जालिमांना धोक्याची सूचना देणारे, असे हे कुरआन. त्याहून थोर चमत्कार कोणता?''

ख्रिश्चनांच्या इस्लामद्वेषावर प्रकाश टाकून इस्लामच्या उदारतेची व आपुलकीची शिकवण कशी याचा समाचार घेताना ते लिहितात, ''ख्रिश्चनांचा सांभाळ करणे, त्यांच्या मंदिरांचे, चर्चेस्चे रक्षण करणे, त्यांच्या धर्मोपदेशकांची वसतिस्थाने रक्षिणे; सर्व अपायांपासून सांभाळणे, अन्याय्य 'कर' न बसविणे, कोणत्याही बिशपला न काढणे, कोणाही ख्रिश्चनास स्वधर्मत्याग करावयास भाग न पाडणे, मठांतून ख्रिश्चन साधूंस न हाकलणे, यात्रेपासून कोणाही यात्रेकरूस न रोखणे, ख्रिस्ती धर्मियांची घरे वा चर्च यांचा मशिदीसाठी उपयोग न करणे, मुस्लिमांशी ख्रिश्चन स्त्रियांनी लग्ने केली तर त्या स्त्रियांना स्वतःचा धर्म पाळण्याची मुभा असणे, धर्माची सक्ती न करणे, ख्रिश्चनांना स्वतःचे मठ वा चर्च यांच्या दुरुस्तीसाठी मदत लागली तर ती देणे; त्यांच्या इतरही धार्मिक गोष्टींस साहाय्य हवे असेल तर ते देणे; परंतु याचा अर्थ त्यांच्या धर्मात आपण सामील झालो असा कोणी करू नये, त्यांच्या गरजेसाठी त्यांना आपण मदत दिली इतकाच याचा अर्थ. बाहेरच्या ख्रिश्चनांशी लढाई चालू असली तरी स्वतःच्या देशातील ख्रिश्चनांस ते केवळ ख्रिश्चन आहेत म्हणून त्रास देऊ नये. जर कोणी त्यांना त्रास देईल तर तो पैगंबरांना कमीपणा आणील!''

किती सुंदर ही हक्काची सनद! पैगंबर मुहम्मद (स.) यांचा अंतरात्मा किती थोर होता. येशू ख्रिस्ताविषयी त्यांना अत्यंत पूज्यबुद्धी वाटे. तसेच ते सर्व शेजाऱ्यांशी

गुण्यागोविंदाने राहू इच्छित होते. ख्रिश्चन धर्मात नाना चर्चा चाललेल्या होत्या व कत्तली होत होत्या. अशा वेळेस ते जर मुस्लिम राज्यात राहावयास आले तर त्यांना केवढे आश्वासन!

उपराकांची फेड उपकाराने करण्याची शक्ती असतानाही जो दया दाखवितो तोच खरा महात्मा. पैगंबर मुहम्मद (स.) शासनाधिकारी या नात्याने राज्य चालवणारे, जनतेच्या मालमत्तेचे व जीविताचे, जनतेच्या स्वातंत्र्याचे वाली या नात्याने न्याय देताना अपराध्यास कठोरपणे शासनही करीत; परंतु पैगंबर या नात्याने, अल्लाहचे पैगंबर या नात्याने ते केवळ क्षमामूर्ती होते. मोठ्यांतल्या मोठ्या शत्रूसही ते क्षमा करीत. न्याय व दया यांचे मधुर मिश्रण त्यांच्या ठायी होते.

"मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदू ऐसे॥"

अशाच कोटीतील पैगंबर मुहम्मद (स.) होते.

साने गुरुजींच्या लिखाणातून काही ठिकाणी एकवचनी दर्शविणाऱ्या वाक्यप्रयोगातून "असा पूर्वी पाहिला नाही, पुढे असा दिसणार नाही" अशा प्रकारच्या लिखाणावर काही वाचकांना पैगंबरांचा अनादर झाल्यासारखे वाटल्याची खंत व्यक्त करण्यात आली होती. वास्तविकता मात्र तशी नाही लिखाण करण्याच्या नियमाचा तो एक भाग आहे. तसेच भाषाशैलीचासुद्धा तो एक प्रकार आहे.

अल्लाहबद्दल तो एकच आहे हे दर्शविण्यासाठी आपण ही जाणीवपूर्वक बोलत असतो की "अल्लाह करता है, अल्लाह सुनने और जाननेवाला है।" शिवाय उर्दूचे कवी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर आपली श्रद्धा व्यक्त करताना लिहितात ते असे-

"सलाम उसपर के जिसने बेकसों की दस्तगिरी की
सलाम उसपर के जिसने बादशाही में फकीरी की।
वो नबीयों में रहमत लकब पानेवाला,..."

अशा लिखाणावर आपण आक्षेप घेत नाही, कारण तसा आक्षेप घेण्याची गरजच नसते. साने गुरुजींच्या जीवनावर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीचा किती प्रभाव आहे हे 'इस्लामी संस्कृती'च्या अध्ययनानंतर कळते. हा तर त्यांच्या भाषाशैलीचा निव्वळ एक प्रकार म्हणावा लागेल. तात्पर्य, त्यांच्या लिखाणातून पैगंबर मुहम्मद (स.) हे बुद्धिवादी इस्लामी लोकसत्तावादी अर्वाचीन महर्षी आहेत. असे ते सिद्ध करू पाहत आहेत हेच आपल्याला जाणवेल.

आपला स्नेही,

अता मुहम्मद

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

मुहम्मद (स.) यांचे आगमन सर्वांसाठी

मुहम्मद (स.) यांचे आगमन केवळ अरबस्तानापुरते नव्हते, ते सर्व जगासाठी होते. कारण त्या काळात सर्वत्रच धार्मिक अवनती झाली होती. झरतुष्ट्र, मोझेस, ख्रिस्त यांनी पेटविलेल्या पवित्र ज्वाला विझून गेल्या होत्या. इराणात श्रेष्ठ-कनिष्ठपणाची बंडे माजली होती. सत्य धर्म लोपला होता. ख्रिश्चन धर्म आपापसातील मतभेदांनी कत्तली करीत होता. शांती देणारा धर्म रक्तस्नात होत होता! हिंदुस्तानाकडेही निराशाच होती. बुद्धांनी दिलेला नीतिधर्म पुन्हा नष्ट झाला. पुन्हा हिंदूधर्माने उचल केली. अनेक देवदेवतांचा धर्म रूढ झाला. नाना देवतांची पुराणे रचिली जाऊ लागली. निरनिराळ्या देवतांचे उपासक आपसात झगडत होते. शाक्तमते पुढे येत होती. उपनिषदांतील थोर धर्म मूठभर लोकांजवळ होता. इतरांचा धर्म म्हणजे कर्मकांड! स्पृश्य-अस्पृश्य, श्रेष्ठनिष्ठपणा यांना सीमा राहिली नाही. निर्गुण, निराकार ब्रह्म शून्य झाले. कर्मकांड वाढले. सतराशे देवदेवतांचा बुजबुजाट झाला. उच्चनीचपणाला ऊत आला.

आणि बौद्धधर्म हिंदुस्तानाबाहेर सर्वत्र होता. त्याचे शुद्ध स्वरूप राहिले नाही. बुद्धांचे अनेक अवतार झाले. नाना बुद्ध निर्माण झाले. त्या त्या देशांनी आपले रंग बौद्धधर्माला दिले. कारण निर्वाणात्मक अभावरूप बौद्धधर्म कोणास पटणार? बुद्धालाच त्यांनी देव केले!

स्त्रियांची सर्वत्र शोचनीय स्थिती होती. गरिबांना मान नव्हता. सर्वत्र दुःख होते. अपमान होते. माणुसकीचा अभाव होता. खरा धर्म लोपला होता. अशा काळात मुहम्मद (स.) आले. त्यांचे येणे आकस्मिक नव्हते. जगाच्या कोंडलेल्या बुद्धिशक्तींना, आत्मशक्तींना मुक्त करण्यासाठी ते आले. मुहम्मद (स.) यांचे आगमन जगाच्या इतिहासाशी संबद्ध होते. सामाजिक, राजकीय, धार्मिक शिथिलतेचा तो काळ होता. अशा परिस्थितीतून नवश्रद्धेचा जन्म होणे अपरिहार्य होते. अशा चिखलातून नवीन सहस्त्रदल सुंदर कमळ मुहम्मद (स.) यांच्या रूपाने फुलले. जगभर त्याचा गंध गेला. आर्तांस त्यातील अनंत मकरंद मिळाला.

कोठे जन्मला हा महापुरुष? अरबस्तानात जन्मणाऱ्या पैगंबर मुहम्मद (स.) यांस दोन अनुकूलता हव्यात. अरबी धर्माच्या पुण्यक्षेत्री, परंपरागत स्थानी जन्मलेला तो असावा आणि अरब रक्ताच्या थोर कुळात तो जन्मलेला असावा. मुहम्मद (स.) यांना

या दोन्ही अनुकूलता मिळाल्या. ते मक्केत जन्मले. काबागृहाची पूजा करणारे श्रेष्ठ कुरेश, त्यांच्या घराण्यात जन्मले.

मक्का शहर अरबस्तानचे केंद्र होते. धर्माचे व व्यापाराचे उत्तर-दक्षिण दरीत ते वसले होते. पश्चिमेकडे उंच टेकड्या. पूर्वेकडेही उंच दगड. मक्केच्या मध्यभागी काबागृहाचे पवित्र प्रार्थनागृह, प्रार्थनागृहाजवळच सार्वजनिक दिवाणखाना. घरे तटबंदी केलेली. रस्ते नीटनेटके व फरसबंदी. असे हे भरभराटलेले, समृद्ध व बळवंत शहर होते.

अशा या मक्केच्या गजबजलेल्या रस्त्यातून एक शांततापूर्ण व्यक्ती हिंडताना दिसे. विचारमग्न व गंभीर अशी ती व्यक्ती दिसे. डोक्यावरील पागोट्यावरून एक रूमाल टाकलेला असे. त्याचे एक टोक उजवीकडून गळ्याखालून डाव्या खांद्यावर टाकलेले असे. कोण ती व्यक्ती? कोण तो पुरुष? मध्यम उंचीचा, रुंद खांद्याचा, दणकट मनगटाचा कोण तो पुरुष? काळेभोर दाट केस खांद्यावर आले आहेत आणि डोके कसे आहे पाहा. भव्य विशाल डोके! आदरणीय डोके! तोंड जरा लांबट, पिंगट रंगाचे, तांबुस छटेचे आणि भुवया बघा कशा सुंदर कमानदार आहेत! आणि दोन भुवयांच्या मध्ये ती पाहा एक ठसठशीत शीर आहे. भावनोत्कट प्रसंगी ती थरारे आणि डोळेही काळेभोर, मोठे. ते डोळे काहीतरी शोधीत आहेत. कोठेतरी पाहात आहेत. अस्वस्थ आहेत ते डोळे! जाड व लांब पापण्यांमधून ते डोळे चमकत. नाकही बाकदार व मोठे आहे आणि दात पहा किती स्वच्छ शुभ्र! दातांची फारच काळजी घेतो वाटते हा? आणि ती साऱ्या बाजूने असलेली सुरेख दाढी. किती रुबाबदार, सुंदर, सामर्थ्यसंपन्न चेहरा हा! कोणाचा हा? काय याचे नाव? कातडी मऊ आहे, स्वच्छ आहे. मुद्रा शुभ्र व लाल आहे आणि हात पाहा, रेशमासारखे, मखमलीसारखे मऊ आहेत. पोशाख साधा. चाल द्रुतगतीची परंतु दृढ. जणू वरून खाली येत आहे. देवाकडून मानवांकडे येत आहे. गंभीर मुखावरही रस्त्यात मुले भेटताच हास्य फुलते आहे पाहा. वाटेत मुले भेटली तर त्यांच्याजवळ प्रेमाने बोलल्याशिवाय हा पुरुष राहत नसे. मुलांचा प्रेमी होता. कारण मुलांजवळ देवाचे राज्य असते. अद्याप स्वर्गाच्या जवळ ती असतात. मुलांचेही त्याच्यावर प्रेम होते. ती त्यांच्याभोवती गोळा होत. आपल्या विचारात मग्न होऊन जरी हा पुरुष जात असला तरी वाटेत कोणी सलाम केला तर लगेच तो सलाम परत करी. मग तो सलाम अगदी हीनदीनाचा का असेना.

कोण होता तो? लोक त्याला 'अल् अमीन' म्हणत. आपण होऊन लोकांनी ही

त्याला पदवी दिली होती. अल् अमीन म्हणजे विश्वासार्ह. त्याचे जीवन इतके आदर्शरूप, सचोटीचे, कष्टाचे, सन्माननीय असे होते की सर्वांना त्याच्याविषयी आदर व विश्वास वाटे. परंतु लोक असे का पाहत आहेत त्याच्याकडे? अल् अमीनाकडे साशंकतेने का पाहत आहेत? हा मनुष्य नवीन धर्म सांगू लागला होता. लोक त्याला वेडा म्हणू लागले. समाजाची जुनी बंधने तो नष्ट करू पाहत होता. प्राचीन हक्क, जुने दुष्ट व भ्रष्ट रीतीरिवाज सोडा असे सांगत होता. हा हट्टी, माथेफिरू क्रांतिकारक आहे, असे आता लोक म्हणत व तो जाऊ लागला म्हणजे संशयाने बघत.

कोण होता तो? ते का पैगंबर मुहम्मद (स.)? होय. होय, तेच ते शांतपणे रस्त्यातून विचारमग्न होणारे व जाणारे. शिव्याशाप, निंदा सहन करीत जाणारे ते मुहम्मद (स.) होते. कुरैशांच्या कुळात, काबागृहाच्या उपाध्यायांच्या कुळात जन्मले होते.

अनाथ पैगंबरांचा जन्म

अब्दुल्लाह यसरिबला सासुरवाडीस जात असता वाटेत मरण पावला. त्याचे वय फक्त पंचवीस वर्षांचे होते आणि त्याच्या दुःखी पत्नीने पुढे लवकरच एका मुलाला जन्म दिला. तेच आपले पैगंबर मुहम्मद (स.)! जो पुढे सर्व अनाथांचा मायबाप झाला, तो जन्मताच पितृहीन होता! इ. स. ५७१ ची तारीख. जेव्हा हा महापुरुष जन्मला. अब्राहा सैन्याच्या नाशानंतरचा तो पन्नासावा दिवस होता.

अरब चालीप्रमाणे एका खेडूत दाईने दूध पाजून महुम्मद (स.) यांस वाढविले. पुढे तिने अमीनाजवळ ते वाढलेले लेकरू आणून दिले. अमीना मोठ्या प्रेमाने व काळजीने देवाचा हा ठेवा वाढवू लागली. तिचे हृदय दुःखाने पोळलेले होते. परंतु मुहम्मद (स.) यांच्या बालमूर्तीकडे पाही व शांत राही. परंतु तीही लवकरच मरण पावली. मुहम्मद (स.) लहानपणीच पोरके झाले! मुहम्मद (स.) यांचे वय सहा वर्षांचे, आई-बापाच्या प्रेमाची पाखर जगात कुठे मिळणार? तसे वात्सल्य कोण देणार? मुहम्मद (स.) यांच्या मनावर या गोष्टीचा फार परिणाम झाला. पोरक्या मुलांना फसवू नका, त्यांना प्रेम द्या, असे कुरआनात अनेक उल्लेख आहेत. पोरक्या मुलांची कधी दीनवाणी स्थिती होत असेल, याचा त्यांना अनुभव आलेला होता. ती आठवण ते कधी विसरले नाहीत.

आजोबांनी, अब्दुल मुत्तलिब यांनी मुहम्मद (स.) यांना आपल्याजवळ घेतले. या नातवावर ते फार प्रेम करीत. देवाला बळी देऊ केलेल्या मुलाचा हा मुलगा. पुढे चालून अब्दुल मुत्तलिब आजारी झाले. आपला मुलगा अबू तालिब यास त्यांनी बोलावले व मरणशय्येवरून सांगितले, "हा तुझ्या भावाचा पोरका मुलगा तुझ्या स्वाधीन मी करत आहे. त्याला प्रेम दे." आणि इ. स. ५७९ च्या अखेर अब्दुल मुत्तलिब देह सोडून गेले.

चुलते अबू तालिब यांच्या घरी मुहम्मद (स.) राहू लागले. लहानपणापासूनच मुहम्मद (स.) विचारी होते. ते नेहमी विचारमग्न असत. डोळे मोठे काळेभोर. जणू आसारांतील सार शोधायला आले होते. सत्यशोधक, जिज्ञासू डोळे. कधी हा मुलगा एकटाच टेकड्यांवर जाई व सृष्टीसौंदर्य पाहात बसे. तेथे रमे, तल्लीन होई. स्वभाव मोठा सौम्य व गोड. दुसऱ्याच्या दुःखाने लगेच दुःखी होत. गहिवरत. फार करुण, कोमल हृदय होते ते. असा भावनोत्कट मुलगा सर्वांचा लाडका झाला. चुलत्या-

पुतण्यांत अपार प्रेम जडले. 'जणू देवदूताने येऊन त्यांची हृदये उघडून आत प्रकाश भरला.'

एकदा चुलत्याबरोबर ते सीरियात व्यापारी काफिल्याबरोबर गेले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या आजोबांनीच दरवर्षी यमन व सीरियात मक्केहून काफिला पाठविण्याची पद्धत सुरू केली होती. ती अद्याप होती. या प्रवासात मुहम्मद (स.) यांनी सामाजिक दु:खे पाहिली, ऐकली. धार्मिक अध:पात सर्वत्र झालेला पाहिला. सीरियाच्या या प्रवासातच वाटेत एके ठिकाणी त्यांना एक ख्रिश्चन साधू भेटला होता. या प्रवासात त्यांनी जे जे पाहिले, ऐकले, अनुभवले त्याची स्मृती त्यांच्या हृदयातून कधीही गेली नाही.

मुहम्मद (स.) यांना घरचे कामधाम करावे लागे. ते उंटांना चारायला नेत. शेळ्या घेऊन जात. मुहम्मद (स.) पुढे म्हणत असत, "ईश्वराने मेंढपाळांतूनच पैगंबर पाठविले!" उंट व शेळ्यामेंढ्या चारताना ते डोंगरावर बसत. सृष्टीसौंदर्य पाहात. पृथ्वीच्या व आकाशाच्या अनंत सौंदर्याची उक्ती कुरआनात पदोपदी आहे. आकाशात व धरेवर सर्वत्र पाहणाऱ्यास ईश्वराच्या खुणा आहेत, असे कुरआन पदोपदी सांगत आहे. ईशज्ञान मुहम्मद (स.) यांना विश्वव्यापक प्रभूच्या सौंदर्यानेच करून दिले असावे. कुरआनातील भव्य सृष्टीवर्णनांची बीजे या वेळेसच, शेळ्यामेंढ्या, उंट चारतानाच-मुहम्मदांच्या हृदयभूमीत पेरली जात होती.

मुहम्मद (स.) आता तारुण्यात होते. विशी-पंचविशीचे वय. या वेळेस ते पुन्हा सीरियात काफिल्याबरोबर गेले. कुरैश घराण्यातील एक स्त्री खदीजा. तिच्या मालाचे उंट घेऊन मुहम्मद (स.) गेले. खदीजा ही दूरची नातलग होती. खदीजा श्रीमंत होती. उदार होती. मुहम्मद (स.) परत आले. त्यांची कार्यनिष्ठा व प्रामाणिकपणा यांचा खदीजेवर परिणाम झाला आणि त्यांचा विवाह झाला. खदीजेचे वय अधिक होते. ती गतविधवा होती. चाळीस वर्षांची होती. मुहम्मद (स.) पंचवीस वर्षांचे. परंतु मुहम्मद (स.) ही आनंदाने लग्नास उभे राहिले!

हे लग्न अत्यंत कल्याणप्रद व शुभमंगल असे झाले. दोघांचे एकमेकांवर फार प्रेम. खदीजेचे हृदय अत्यंत प्रेमळ होते. मुहम्मद (स.) विषयी अपार प्रेम वाटे. या लग्नाने मुहम्मद (स.) यांना शांती, विश्रांती मिळाली. ज्या महान कार्यासाठी त्यांचा जन्म होता, त्याचा विचार करायला त्यांचे मन मोकळे झाले. प्रेमळ स्त्रीहृदय त्यांना मिळाले. या अवघ्या जगात त्यांच्या पैगंबर कार्यावर तिनेच प्रथम विश्वास ठेवला. निराशेत ती

त्यांना शांत करी, आधार देई, धीर देई. ती आशेची ज्योत विझू देत नसे. जेव्हा जगाचाच नव्हे तर स्वतः मुहम्मद (स.) यांचाही स्वतःवर विश्वास बसेना तेव्हा तिने विश्वास ठेवला! ज्या वेळेस मुहम्मद (स.) यांच्या डोळ्यांसमोर सर्व जग अंधारमय होते, तेव्हा तिने श्रद्धेचा, आशेचा दीप प्रज्वलित ठेवला.

माननीय खदीजा (रजि.) पासून मुहम्मद (स.) यांना सात मुले झाली. तीन मुलगे व चार मुली. परंतु सारे मुलगे बालपणीच निधन पावले. मुहम्मद (स.) यांना मुलगा राहिला नाही. त्यांचे शत्रू त्यांचा उपहास करण्यासाठी 'अल् - अब्तर' म्हणजे निपुत्रिक असे त्यांना संबोधित.

लग्नानंतरची पंधरा वर्षे मक्केत आत्मचिंतनात गेली. ते फारसे बोलत नसत. परंतु जेव्हा बोलत तेव्हा जोर देऊन बोलत, ठासून बोलत, विचारपूर्वक, जाणून समजून बोलत. पैगंबर मुहम्मद (स.) जे बोलत ते ऐकणारा कधी विसरत नसे. त्यांच्या बोलण्याचा ऐकणाऱ्यांवर विलक्षण परिणाम होई. पुष्कळ वेळा ते अशांत, चिंतीत, कष्टी असे असत. परंतु एकदम कोठूनतरी त्यांना स्फूर्ती येई. उत्साह संचारे. खिन्नता अस्तंगत होई. प्रसन्नता मुखावर पसरे. ते हसू बोलू लागत.

आणि लहान मुले म्हणजे त्यांचा प्राण! ही भावी पिढी जणू ते तयार करीत होते. रस्त्यांत मुलांना थांबवतील, त्यांच्या पाठीवरून हात फिरवतील. त्यांना लहानलहान गोष्टी सांगतील, त्यांच्याबरोबर दऱ्याखोऱ्यातून, पहाडांतून भटकतील. त्यांच्याबरोबर खेळतील. ख्रिस्तही लहान मुलांचे असेच शौकीन होते. मुले म्हणजे देवाची प्रभा! या पंधरा वर्षांच्या काळात अंतपरीक्षण चालले होते. श्रद्धा व संशय यांची लढाई चालली होती. भावी कार्याची सिद्धता, तयारी होत होती. आध्यात्मिक ऐक्य अंतरंगी अनुभवीत होते.

मक्केत लोकांचे जीवन सुरक्षित नसे. त्यांची मालमत्ता लुटली जाई. त्यांच्या बायकामुली पळविल्या जात. पैगंबर मुहम्मद (स.) यांना हा अन्याय पाहवेना. 'हल्फ-उल्-फझूल' नावाची त्यांनी एक संस्था स्थापिली. प्राचीन काळी अशी एक संस्था होती. त्या प्राचीन संस्थेचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पुनरुज्जीवन केले. या संस्थेच्या दबदब्यामुळे दुबळ्यांस व गरिबांस संरक्षण मिळे. या संस्थेने जरा धमकी देताच काम होत असे. दुष्कर्मीयांच्या दुष्ट कृत्यांस आळा बसला. ही संस्था पुढे सातव्या शतकाच्या अखेरपर्यंत होती.

पैगंबर मुहम्मद (स.) गंभीरपणे विचार करू लागले. त्यांचा आत्मा उड्डाण करू लागला. सृष्टीच्या गुढ रहस्यात त्यांचा आत्मा डोकावू लागला. अनंततेच्या दरीत पाहू लागला. सत्य काय असत्य काय? जीवन मरण काय? या विश्वाच्या गोंधळातही काही व्यवस्था आहे का? मुहम्मद (स.) शोधू पाहात होते. त्यांना तळमळ लागली आणि देवाची वाणी त्यांच्या पवित्र, उदात्त हृदयाने ऐकली व ती वाणी जगाला नवजीवन देती झाली.

"ऊठ, जगाला सत्याची सूचना दे. प्रभूचे गौरवगान गा. त्याचे वैभव गा."

असा स्पष्ट आदेश मिळाला. अंत: शंका-संभ्रम नाही. मुहम्मद (स.) आता उभे राहिले. अचल श्रद्धेने व अपार विश्वासाने उभे राहिले. सारे छळ, यातना, हालअपेष्टा यांना न जुमानता उभे राहिले. सत्यासाठी उभा राहिलेला हा महापुरुष असत्यासमोर शेवटपर्यंत नमला नाही.

हा सारा मनाचा खेळ होता का? मुहम्मद (स.) यांना जे देखावे दिसत, जे शब्द ऐकू येत, जे देवदूत दिसत ही सारी का प्रक्षुब्ध मनाची निर्मिती होती? ही का केवळ स्वत:ची स्वप्ने? सांगता येणार नाही. मानसशास्त्राचा अभ्यास अर्वाचीन शास्त्रज्ञांना अद्याप करावयाचा आहे. इंद्रियातील अशीही एक ज्ञानप्राप्तीची शक्ती मनुष्याला आहे. ते ज्ञान खोटे असे कोण म्हणेल? ते अनुभव खोटे असे कोण म्हणेल? महापुरुष सांगतात की आम्हाला असे असे अनुभव आले. ते प्रत्यक्षाच्याच गोष्टी बोलतात, करतात. तुम्हा-आम्हाला जे प्रत्यक्ष नसते ते त्यांना असते. त्यांना ते पाहण्याचे डोळे असतात. जणू निराळीच इंद्रिये मनाला फुटतात! काही असो, ती आत्मवंचना खास नव्हती.

"तो मी ईश्वराचा दूत जिब्रिल (अ.). मी तुला ईश्वराचा मंगल संदेश घेऊन आलो आहे, ऊठ ईश्वराचा महिमा गा, उत्साही हो, पवित्र हो, शुद्ध हो, प्रत्युपकाराची, फळाची अपेक्षा ठेवून उपकार करू नको, तू भले कर, सर्वांचे मंगल कर, तुझ्या मंगल कार्याला फळ येईल, वाट पाहा, ईश्वरावर श्रद्धा ठेवून धीराने, उतावीळ न होता वाट पाहा."

असे शब्द त्यांना ऐकू येत. जणू समोर दिसत आणि संशय झडझडून टाकून आत्मविश्वासाने एका ईश्वराचे, त्या अद्वितीयाचे गुणगान गावयास ते उभे राहिले.

ही तर प्रामाणिकपणाची खूण

मुहम्मद (स.) एका ईश्वराचे पैगंबर म्हणून प्रचार करू लागले. चाळिशी नुकतीच संपली होती आणि आयुष्याचा उरलेला भाग आता ईश्वरदत्त महान कार्यासाठी ते अर्पण करू लागले आणि त्याच्यावर प्रथम विश्वास कोणी ठेवला? त्याच्याजवळच्या मंडळींनी, पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या उत्कट तळमळीची व सत्याची याहून दुसरी कोणती निशाणी? जवळची मंडळी त्यांचा नवधर्म घेती झाली. त्यांना शंका वाटली नाही. हा ईश्वरी पुरुष आहे असे त्यांना वाटले. त्यातही सर्वांत आधी खदीजा (रजि.) ती पहिली अनुयायी, पैगंबर मुहम्मद (स.) यांस ईशज्ञान झाले आहे असे जर कोणी पाहिल्याने विश्वासपूर्वक मानले असेल तर ते खदीजाने. मूर्तिपूजा सोडून, त्या परम कारुणिक ईश्वराची, मुहम्मद (स.) यांच्याबरोबर प्रथम जर कोणी प्रार्थना म्हटली असेल तर ती खदीजा (रजि.) यांनी मुहम्मद (स.) यांच्या ईश्वरी जीवनकार्यावर तिनेच प्रथम श्रद्धा ठेवली. इतकेच नव्हे तर पुढील विवादात तिने त्यांना सदैव धीर दिला. जेव्हा ते कावरेबावरे होऊन त्या रात्री तिच्याकडे आले व "खदीजे, खदीजे; पांघरुण घाल माझ्यावर, कपड्यात लपेट मला." असे म्हणाले त्यावेळेस ईश्वराने खदीजेच्या रूपानेच जणू त्यांना धीर दिला, शांती दिली. तीच त्यांना म्हणाली, "उठा." तिनेच त्यांचा बोजा हलका केला. माझी तुमच्यावर श्रद्धा आहे म्हणाली. लोकांना वाटेल ते बडबडू द्या. लक्ष नका देऊ, असे म्हणाली. ईश्वराने ज्ञान दिले, खदिजेने शांती व विश्वास दिला. दुसरे अनुयायी अली (रजि.) व तिसरा अनुयायी जैद (रजि.) झाला. तो गुलाम, ज्याला मुहम्मद (स.) यांनी एकदम मुक्त केले होते, त्याने हा नवधर्म घेतला आणि चौथे अनुयायी कोण झाले? अबू बकर (रजि.), ते मक्केतील श्रीमंत व्यापारी होते. उदार, शहाणे, धोरणी, शांत, धीराचे होते. मुहम्मद (स.) यांना 'अल्-अमीन' म्हणत, तसे यांना 'अस्-सिद्दीक' म्हणजे सच्चा असे म्हणत. मुहम्मद (स.)याहून दोनच वर्षांनी ते लहान होते. त्यांना काबाचा सेवक असेही म्हणत. अशा वजनदार व थोर पुरुषाने हा नवधर्म एकदम स्वीकारला, या गोष्टीचा मोठा नैतिक परिणाम झाला. त्यांच्या पाठोपाठ आणखी पाच या नवधर्मात आले. अबू बकर (रजि.) पुढे खलीफा झाले. तसेच पुढे खलीफा होणारे उस्मान (रजि.) हे मिळाले. उस्मान (रजि.) हा प्रतिस्पर्धी उमैया घराण्यातील होता. दुसरा अब्दुल रहमान (रजि.), तिसरा साद (रजि.)- ज्याने पुढे इराण जिंकून घेतला. चौथा खदीजा (रजि.) चा नातलग जुबैर (रजि.) आणि पाचवा तो शूर लढवय्या तल्हा (रजि.). उस्मानने नवधर्म स्वीकारला हे

ऐकून त्याचे चुलते संतापले.

त्यांनी उस्मान (रजि.)ला बांधले व विचारले, "पूर्वजांच्या धर्मापेक्षा तुला का हा नवा धर्म पसंत आहे? जो नवा धर्म तू घेत आहेस तो जोपर्यंत तू सोडणार नाहीस, तोपर्यंत मी तुला सोडणार नाही." परंतु उस्मान (रजि.) उत्तरला, "त्या ईश्वराचीच शपथ घेऊन मी सांगतो, की तो नवधर्म मी प्राण गेला तरी सोडणार नाही!"

काही अनुयायी कनिष्ठ व सामान्य जनतेतीलही मिळाले. मक्केतील काही निग्रो गुलाम या नवधर्माचा स्वीकार करते झाले. तो हब्शी 'बिलाल'(रजि.) इस्लामी इतिहासात प्रसिद्ध आहे. इस्लामी धर्माचा पहिला मुअज्जिन म्हणून बिलाल प्रसिद्ध आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा हा अत्यंत निष्ठावंत शिष्य होता. अभंग श्रद्धेचा धर्मात्मा होता. मुहम्मद (स.) प्रेमाने म्हणत, "बिलाल म्हणजे ॲबिसिनियाचे सर्वोत्तम फळ आहे!"

मुहम्मद (स.) यांच्या अत्यंत जवळचे आप्त मित्र त्यांचे पहिले अनुयायी. मुहम्मद (स.) यांची तळमळ, त्यांची दैवी स्फूर्ती, त्यांची पवित्र शिकवण, त्यांची उत्कटता यांचा हा पुरावा आहे. या जवळच्या सुज्ञ मंडळींना मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीत वंचना दिसती, अश्रद्धा वा केवळ ऐहिकता दिसती तर मुहम्मद (स.) यांची सामाजिक सुधारणेची व नैतिक पुनरुज्जीवनाची सारी आशा मातीत मिळाली असती. या अनुयायींनी छळ सहन केले. संकटे सोसली. शारीरिक वेदना व मानसिक दुःखे सहन केली. बहिष्कार, मरण यांनाही तोंड दिले. मुहम्मद (स.) यांच्या ठायी त्यांना यत्किंचितही काळे दिसते तर अशी अडग श्रद्धा जन्मेल का? ख्रिस्तावर त्यांच्या भावांचा जवळच्या मंडळींचा यत्किंचितही विश्वास नव्हता. परंतु मुहम्मद (स.) या बाबतीत दैववान होते. मुहम्मद (स.) यांच्या अनुयायांची अचल श्रद्धा हीच त्यांच्या स्वीकृत कार्याविषयीच्या अत्यंत प्रामाणिकपणाची खूण आहे.

क्रांतिकारी सफल जीवन

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी रानटी लोकांतून नवी संस्फूर्त असे संघटित राष्ट्र निर्माण केले. त्यांना ईशज्ञान देऊन कृतार्थ केले, पवित्र केले. त्यांना धर्मग्रंथ दिला. नाना देवांची उपासना करणारे, रक्तपातात रंगणारे असे अरब होते. त्यांना 'तो सत्यमय व प्रेममय एक अद्वितीय ईशपूजा' असे ते सांगते झाले. विभक्तांना त्यांनी एकत्र केले. विभक्त झालेल्या अरबांना त्यांनी जोडले. बंधुभावाने बांधले. संघटित केले. अनादिकाळापासून हे द्वीपकल्प अंधारात गुडुप होते. आध्यात्मिक जीवनाचे नावही नव्हते. ज्यूंच्या वा ख्रिस्तांच्या धर्माचा टिकाऊ परिणाम अरबांवर झाला नव्हता. रुढी, दृष्टता, दुर्गुण यांच्या घाणीत सारे बरबटलेले होते. व्यभिचार होता. लहान मुलींना पुरीत! मोठा मुलगा स्वत:च्या आईशिवाय बापाच्या ज्या इतर बायका असत, त्यांना स्वत:च्या बायका करी.

थोड्या वर्षांपूर्वी असा हा अरबस्थान होता. परंतु मुहम्मद (स.) यांनी केवढे स्थित्यंतर केले! जणू स्वर्गातील देवदूत खाली वावरायला आला. ज्यांची मने अर्धवट जंगली होती, अशांची मने भ्रातृभाव व प्रेम यांनी भरून गेली. अरबस्तान नैतिकदृष्ट्याही ओसाड वाळवंट होते. देवाच्या व माणुसकीच्या सर्व कायद्यांची तेथे पायमल्ली होत होती; परंतु मुहम्मद (स.) यांनी तेथे नैतिक नंदनवन फुलविले. नीतीचे मळे फुलविले. प्रेमाची फुले फुलविली. मूर्तिपूजा व तद्नुषंगिक इतर वाईट चाली यांचे निर्मूलन केले.

जो अल्लाह स्वत:च्या सामर्थ्याने व प्रेमाने या विश्वाचे नियमन करतो त्या एकमेव अल्लाहची जाणीव अरबांना पूर्णपणे आली. मूर्तिपूजेचा संपूर्ण त्याग मुहम्मद (स.) यांनीच करून दाखविला. इस्लाम धर्मात मूर्तिपूजा कोणत्याही स्वरूपात पुन्हा आली नाही आणि जी अरब जात केवळ मूर्तिपूजक होती त्यांना संपूर्णपणे केवळ एका ईश्वराला भजणारे मुहम्मद (स.) यांनी केले. ही खरोखर अद्भुत व अपूर्व अशी गोष्ट होती.

पैगंबर मुहम्मद (स.) यांची वाणी अत्यंत प्रभावी होती. ती दैवी संस्फूर्त वाणी वाटे. अल्लाहचे अद्वितीयत्व इतक्या उत्कटपणे, तीव्रपणे क्वचितच कोठे उपदेशिले गेले असेल, उद्घोषिले गेले असेल. अरब अत:पर केवळ ऐहिकदृष्टीचे राहिले नाहीत. मरणानंतर अधिक उच्चतर, शुद्धतर व दिव्यतर असे जीवन असते. त्या पारलौकिक

जीवनासाठी या जीवनात दया, चांगुलपणा, न्याय, सार्वत्रिक प्रेम जीवनात दाखविली पाहिजेत, असे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शिकविले.

हा जो अमूर्त ईश्वर तो अनाद्यनन्त आहे तो विश्वाधार आहे. सर्वशक्तिमान, प्रेमसिंधू व दयासागर आहे. ही जी नवजागृती आली त्याचे मुहम्मद (स.) स्फूर्तिस्थान होते. ईश्वराच्या आदेशाने या नवचैतन्याचे ते आत्मा होते, प्राण होते ते! जणू नवप्रेरणेचे अनंत निर्झर होते. या झऱ्यातून अरबांच्या शाश्वत आशांचे प्रवाह वाहत होते आणि म्हणून मुहम्मद (स.) यांच्याविषयी भक्तिभाव ते प्रकट करीत.

सर्व अरबांची जणू आता एकच इच्छा झाली की त्या अल्लाहची सत्याने व पावित्र्याने सेवा करावी. अल्लाहची आज्ञा व इच्छा जीवनाच्या सर्व क्षेत्रांतून प्रकट करावी. या वीस वर्षांत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी जे जे सांगितले, जी जी वचने उच्चारिली, जे जे मार्गदर्शन केले, जी सत्ये दिली, ते सारे अरबांच्या हृदयात जणू कोरल्यासारखे झाले होते. त्यांच्या जीवनाची ती श्रुतिस्मृति झाली होती. कायदा व नीती यांचे ऐक्य झाले. सद्सद्विवेकबुद्धीसाठी आनंदाने बलिदाने करणारे दिसू लागले. त्यागाची पराकाष्ठा करणारे शोभू लागले. जगाला एवढी मोठी जागृती इतक्या तीव्रपणे व उत्कटपणे क्वचितच कोणी दिली असेल.

मुहम्मद (स.) यांनी आपल्या हयातीत आपले कार्य पुरे केले. बुद्धाचे काम अशोकाने पुरे केले. ख्रिस्ताचे कॉन्स्टंटाईनने, झरतुष्ट्राचे उरायसने, बनीइस्त्राईलांचे जोशुआने. परंतु मुहम्मद (स.) एक असे झाले ज्यांनी स्वत:चे व पूर्वी होऊन गेलेल्यांचेही कार्य पुरे केले. जणू सारे काम अल्लाहच करवीत होता, मुहम्मद (स.) निमित्तमात्र होते, असे मुस्लिमांनी म्हटले तर त्यात काय आश्चर्य?

ज्याला कालपरवापर्यंत दगड फेकून मारीत होते, ज्याला ठार करण्यासाठी जंग जंग पछाडीत होते, त्यानेच नऊ-दहा वर्षांच्या अवधित आपल्या लोकांना नैतिक अध:पतनाच्या दरीतून पावित्र्य व न्याय यांच्या शिखरावर नेऊन बसविले. प्रणाम, सहस्त्रप्रणाम, त्या महापुरुषाला.

मुहम्मद (स.) यांचे जीवन उदात्ततेचा आदर्श आहे. उदात्त कर्मांनी खच्चून भरलेले असे हे पुण्यश्लोक जीवन आहे. सुप्त लोकांत त्यांनी चैतन्याची कळा संचरविली. परस्पर भांडणाऱ्यांना त्यांनी एक केले. अमर जीवनाच्या आशेने कर्तव्यकर्म करण्याची त्यांनी प्रेरणा दिली. मानवी हृदयावर इतस्तत: पडलेले किरण केंद्रिभूत व

पुंजीभूत करून त्यांनी प्रचंड प्रकाशाचा झोत निर्माण केला आणि त्यांचा उत्साह कसा, आशा कशी अदम्य व अमर! थांबणे नाही. तडजोडीस वाव नाही.

अप्रतिहत धैर्याने हा महापुरुष सारे अडथळे झुगारून पुढेच जात राहिला. त्यांनी परिणामांची दरकार कधीच बाळगिली नाही. ईश्वरावर श्रद्धा ठेवून जात होते. एकाच ध्येयाचा त्यांना सदा निदिध्यास. स्वत:च्या जणू संपूर्ण विसर त्यांना पडला होता. ख्रिस्ताने निराकार प्रभूचा धर्म दिला; परंतु त्या धर्मात मेरीची मूर्तिपूजा शिरली. परंतु मूर्तिपूजेत चुस्त गढून गेलेल्या अरबांना या न पढलेल्या फकीराने इतक्या प्रखरतेने ईश्वराची एकता पटविली की ती वज्रलेप झाली. ज्यांनी ज्यांनी म्हणून पैगंबरांची वाणी एकदा ऐकली, त्यांच्या मनावर ईश्वराचे अद्वितीयत्व व मानवी बंधुभाव यांचा वज्रप्राय ठसा उमटल्याशिवाय राहत नसे.

अखेरचा उपदेश

मुहम्मद (स.) समानतेचे व लोकसत्तेचे भोक्ते होते. त्यांच्या लोकसत्तेच्या गर्जनेने, राजेमहाराजे व धर्मोपदेशक गडबडून गेले. मानवी बुद्धीने बंड करावे म्हणून तो इशारा होता. त्या वेळेस जुलमी संस्था व भांडकुदळ पंथ यांचा बुजबुजाट झाला होता. दुर्बोध चर्चांत मानवी आत्मा गुदमरत होता आणि मानवी शरीर वतनदारांच्या वर्चस्वाखाली तुडविले जात होते; परंतु पैगंबर आले. त्यांनी ही मिरासदारीची भिंताडे साफ पाडली. विशिष्ट हक्क त्यांनी नष्ट केले. स्वार्थी लोकांनी ईश्वराकडे जावयाच्या रस्त्यावर जी जाळी विणून ठेवली होती. ती पैगंबरांनी आपल्या जोरदार फुंकरीने नष्ट केली. रस्ता साफ मोकळा झाला. ''अल्लाहजवळ तुम्ही सारे निर्धास्तपणे जा. तेथे सारे समान. तेथे कोणाला जादा अधिकार नाहीत.'' पैगंबर स्वत: पंडित नव्हते; परंतु ज्ञान-विज्ञानाची महती त्यांनी गायिली आहे. मानवी इतिहास लेखणीने लिहिला जातो. लेखणीने मानवाचा निवाडा केला जातो, न्याय दिला जातो. मानवी कृत्यांची छाननी करणारे, अल्लाहच्या दृष्टीने छाननी करणारे साधन म्हणजे लेखणी, लेखणी म्हणजे ज्ञान, ज्ञानाशिवाय सारे फोल आहे. ''शिका, वाचा, पाहा.'' असे मुहम्मद (स.) सांगतात.

ते बुद्धीवर फार जोर देत. आश्चर्ये, चमत्कार असल्या प्रकारांना ते कधीही उत्तेजन देत नसत. भोळसटपणा व बावळटपणा त्यांना पसंत नव्हता. ईश्वरी शासनाविषयीची जी त्यांची कल्पना होती ती सर्वांना समान प्रवेश देणारी होती. पैगंबरांचा ईश्वर लोकशाहीचा भोक्ता आहे. तो कोणी हुकूमशहा नाही.

मुहम्मद (स.) यांचे धार्मिक ध्येय व्यापक आहे. त्यांची मानवता साधी व सरळ आहे. या सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे मुहम्मद (स.) यांचे पूर्वीच्या धर्माचार्यांपेक्षा विशिष्टत्व दिसते. ते जणू अर्वाचीन महर्षी आहेत, असे वाटते. त्यांचे जीवनकार्य उघडे आहे. स्पष्ट समोर जगाच्या पुढे आहे. त्यात गूढता नाही. अस्पष्टततेत ते लपलेले नाही. त्यांच्या व्यक्तित्वाभोवती पुराणे रचली गेली नाहीत. दंतकथा गुंफिल्या गेल्या नाहीत.

अरबस्तानातील जमातीपाठीमागून जमाती नवधर्माच्या स्वीकारार्थ जसजशा येऊ लागल्या तसे मुहम्मद (स.) यांना वाटू लागले की आपले कार्यही समाप्त होण्याची वेळ आली. मक्केची शेवटची यात्रा करून यावे असे त्याच्या मनात आले. इ. स. ६३२ च्या फेब्रुवारीच्या २३ तारखेस ते निघाले. त्याच्या बरोबर लाख दीड लाख यात्रेकरू

होते. 'हज्जतुल विदा' म्हणजे पैगंबरांची अंतिम हज यात्रा किंवा इस्लामी यात्रा. मीनाच्या दरीत यात्रेचे सारे विधी त्यांनी केले. हे विधी उरकण्यापूर्वी ७ मार्च रोजी जबल-उल-अरफात या टेकडीवरून हजारो मुस्लिमांसमोर त्यांनी शेवटचे प्रवचन दिले. मुहम्मद (स.) एक वाक्य उच्चारीत. ते वाक्य खालच्या लोकांत असलेला पुन्हा उच्चारी. त्या वेळेस ध्वनिक्षेपक नव्हते. सर्वांना ऐकू जावे म्हणून जिवंत ध्वनिक्षेपक उभे केले होते. ते साधे सरळ प्रवचन होते.

"बंधुंनो, मी आज सांगतो ते ऐका. कारण आणखी एखादे वर्ष मला लाभेल असे वाटत नाही. या जागी पुन्हा तुमच्यात मी दिसेन, वावरेन, बोलेन असे वाटत नाही. हा आजचा दिवस व हा महिना जसा सर्वांना पवित्र वाटतो, त्याप्रमाणे सर्वांचे जीवन व मालमत्ता पवित्र माना. तुम्ही एकमेकांचे जीवन पवित्र माना. एकमेकांना सांभाळा. ईश्वरासमोर जाण्याची वेळ येईपर्यंत असे प्रेमाने व बंधुभावाने वागा. कोणाच्या प्राणांचा वा घरादारांचा नाश नका करू. एके दिवशी ईश्वराच्या न्यायासनासमोर उभे राहावयाचे आहे, हे कधीही विसरू नका. त्या दिवसाची नेहमी आठवण ठेवा. तेथे सर्व कृत्यांचा हिशेब द्यावा लागेल.

"मित्रांनो, पतीचे पत्नीवर काही हक्क आहेत, तसेच पत्नीचेही पतीवर आहेत. आपल्या बायकांना प्रेमाने व सहानुभूतीने वागवा. कठोर नका होऊ, दयाळू राहा. तुम्ही ईश्वराला साक्षी मानून आपल्या पत्नीचा स्वीकार केलेला असतो. खरे ना? ईश्वराच्या शब्दाने त्या तुमच्या कायदेशीर भार्या झालेल्या असतात, ही गोष्ट विसरू नका.

"तसेच तुमच्यावर कोणी विश्वास टाकला तर विश्वासघात करू नका. दिला शब्द पाळा, पाप टाळा. सावकारी निषिद्ध आहे, व्याजबट्टा वर्ज्य आहे, हे ध्यानात धरा. पैसे उसने घेणाऱ्याने घेतले तेवढे परत करावे, व्याज देऊ नये, मुद्दलाची फेड व्हावी. माझ्या मंडळीपासूनच याची अंमलबजावणी सुरू होईल. चुलते अब्बास ऋणकोपासून मुद्दल तेवढेच घेतील.

"आणि प्राचीन काळापासून तुम्ही जाहिलियत मानीत आलात. रक्ताचा सूड घेत आलात. खुनाचा बदला घेत आलात; परंतु आजपासून ते बंद होत आहे. ही गोष्ट निषिद्ध आहे. इस्लाममान्य नाही. आजपासून सारी सुडाची भांडणे रद्द झाली. हारीसाचा मुलगा रबिया यांचा खून झाला; परंतु त्याचा सूड घेण्यात येणार नाही. माझ्याच आप्तेष्टांपासून हा नवीन नियम सुरू करू या. इब्न रबियाच्या या उदाहरणाने आपण नवीन आरंभ करू या. (इब्ने रबिया लहान असताना दुसऱ्या जमातीच्या ताब्यात

संरक्षणार्थ देण्यात आला होता; परंतु हुझैल जातीने त्याचा क्रूरपणे वध केला होता. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा हा चुलत भाऊ होता.)

"आणि तुमचे गुलाम. त्यांना नीट वागवा. तुम्ही खाल तेच त्यांनाही खायला द्या. तुम्ही कपडे घालाल तसेच त्यांना द्या. अक्षम्य असा अपराध त्यांनी केला तरच त्यांना सोडा. लक्षात ठेवा की, कसेही झाले तरी तेही खुदाचे बंदे आहेत. त्यांना कठोरतेने वागवता कामा नाये. मित्रांनो, माझे शब्द ऐका, नीट समजून घ्या. सारे मुस्लिम एकमेकांचे भाऊ आहेत हे कधीही विसरू नका. तुमचे सर्वांचे एक जणू भ्रातृमंडळ, एक तुमचा महान भ्रातृसंघ. जे दुसऱ्याचे आहे ते त्याने स्वेच्छेने, खुशीने दिल्याशिवाय त्याला हात लावू नका. अन्यायापासून व अन्याय करणाऱ्यापासून दूर राहा, सावध राहा. जे येथे आज हजर आहेत त्यांनी हे सारे गैरहजर असणाऱ्यांस सांगावे. येथे ऐकणाऱ्यांपेक्षाही ज्याला सांगितले जाईल तो कदाचित ते अधिकच लक्षात ठेवण्याचा संभव आहे."

असे हे प्रवचन बराच वेळ चालले होते. साधे, सरळ, कळकळीचे, वक्तृत्वपूर्ण असे ते प्रवचन होते. भावनाप्रधान श्रोत्यांची अंत:करणे उचंबळत होती, थरारत होती आणि प्रवचन संपल्यावर पैगंबरांनी पुढील शब्दांनी शेवट केला : "हे अल्लाह, मी तुझा संदेश दिला. मी माझे कार्य पुरे केले आहे."

त्याचबरोबर सभा गर्जती झाली, "खरोखरच तुम्ही आपले कार्य पुरे केले आहे." पैगंबर पुन्हा अखेर म्हणाले, "हे अल्लाह! माझ्या कामाला तुझीच साक्ष. दुसरे मी काय सांगू? हीच माझी प्रार्थना."

ख्रिस्ताचे पर्वतावरील प्रवचन अधिक काव्यमय वाटते. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे हे पर्वतोपनिषद साधे आहे. त्यात गूढ गहन काही नाही. साध्या गोष्टी; परंतु रोजच्या जीवनातील. घरीदारी कसे वागावे, संसारच सुंदर व सारमय कसा करावा, ते त्यांनी सांगितले. सर्वसामान्य लोकांना नैतिक मार्गदर्शनार्थ स्पष्ट व सुबोध दिशा हवी असते, ती स्पष्ट दिशा या प्रवचनात होती.

सखा कृपावंत

प्रवचनानंतर यात्रेचे सर्व विधी करून पैगंबर मुहम्मद (स.) पुन्हा मदीनेस जाण्यासाठी निघाले. मदीनेने त्यांना आधार दिला होता. तेथेच ते देह ठेवू इच्छित होते. शेवटचे वर्ष होते. प्रांताची व्यवस्था लावण्यात येत होती. मुस्लिम फेडरेशनमध्ये नवधर्म स्वीकारून ज्या जातिजमाती सामील झाल्या होत्या, त्या सर्वांची नीट सुसंघटित व्यवस्था लावण्यात आली. सीरिया व मेसापोटेमियामधील अरब लोकांत जरी इस्लाम अद्याप पसरला नव्हता तरी अरबस्तानात बहुतेक सर्वत्र इस्लामच झाला होता. जनतेला इस्लामी धर्माची शिकवण देण्यासाठी तसेच न्यायदानार्थ व जकातीच्या (म्हणजे गरिबांसाठी जो कर असे तो) वसुलीसाठी माणसे नेमून सर्वत्र पाठवावी लागत. यमनमध्ये मआज बिन जबल याला पैगंबर पाठवीत होते. त्याला निरोप देताना पैगंबरांनी विचारले,

"एखाद्या विशिष्ट प्रसंगी अडचण आली तर कसा वागशील?"

"कुरआनात पाहीन."

"परंतु कुरआनातही त्या प्रसंगी कसे वागावे ते न आढळले तर?"

"तुमचे चरित्र डोळ्यांसमोर आहे."

"माझ्याही चरित्रात तसा प्रसंग नसेल आलेला तर?"

"तर मग मी 'इज्तिहाद' करीन (कुरआन व हदीसच्या प्रकाशात तज्ज्ञ मंडळींशी चर्चा करून निर्णय घेईन)."

"शाबास! अशा प्रसंगी 'इज्तिहाद' कर."

पुढे इस्लामी कायद्याची जी वाढ झाली त्यासाठी ही गोष्ट महत्त्वाची आहे. पहिले प्रमाण कुरआन नंतर मुहम्मद (स.) यांचे जीवन त्यांनी दिलेले निकाल, त्यांची वचने, मते आणि शेवटी या दोहोंच्या प्रकाशात तज्ज्ञ मंडळींशी चर्चा करून निर्णय घेणे.

त्यांनी असत्याशी कधी तडजोड केली नाही. ईश्वर एक आहे या तत्त्वाशी ते कसलीही तडजोड करायला तयार नसत.

जीवनात मिळते घेण्यासाठी ते तयार असत. समाजातील भांडणे कमी व्हावी अशी त्यांना फार इच्छा असे. ज्यू व ख्रिश्चन यांच्याजवळ त्यांनी पुन:पुन्हा मिळते घेतले. विशेषत: ज्यूंजवळ. परंतु या ज्यूंनी पुन:पुन्हा विश्वासघात केला. नवीन

शासनसत्तेचा विश्वासघात केला; म्हणून मुहम्मद (स.) यांना कठोर व्हावे लागले. कुरआनातील बरेचसे उल्लेख हे विशेषतः ज्यूंना उद्देशून आहेत. त्या त्या विश्वासघातामुळे, सात्त्विक संतापाने ते आलेले आहेत; परंतु मुहम्मद (स.) क्षमामूर्ती होते. ते स्वतःचा धर्म सक्तीने लादू इच्छित नसत. आईबापांनी मुलांवरही धर्माची सक्ती करू नये म्हणत. आपण धर्माचा उपदेश करावा. फळ देणे ईश्वराहाती. तो न्याय घेईल. योग्य ते वाढवील. त्याची इच्छा असती तर सारे एका धर्माचे नाही का होणार? प्रत्येक देशात त्याने ईश्वरी पुरुष निर्मिले, अपौरुषेय धर्मग्रंथ दिले. 'माझा धर्म मला, तुझा तुला, कशाला झगडा?' असे म्हणावे. आपली मते शांतपणे बुद्धिपूर्वक मांडावी. सक्ती नको.'' असे ते सांगत. पैगंबर सर्वांशी सलोख्याने राहू इच्छित होते.

मुहम्मद (स.) केवळ क्षमामूर्ती होते. स्वतःवर अपकार करणाऱ्यावर त्यांनी उपकारच केले. विष पाजणाऱ्यांसही प्रेम दिले. मारायला आलेल्यास प्राणदान व दया शिकविली. आपल्या मुलीचा क्रूर खून करणाऱ्यासही क्षमा केली. राज्याच्या गंभीर प्रसंगी ते कठोर होत; परंतु वैयक्तिक जीवनात कठोरता त्यांना माहीत नव्हती. ते सर्वांशी प्रेमळपणाने वागत. त्यांच्या प्रेमळ वर्तनाच्या शेकडो गोष्टी आहेत. त्यांचे कोमल संस्कारी मन त्या गोष्टींतून प्रकट होते.

केलेला करार त्यांनी कधी मोडला नाही. दिलेला शब्द सदैव पाळला. त्यांनी कधी कोणाला मारले नाही. बोलण्यात कधी रागावलेच तर, ''झाले तरी काय तुला! तुझे कपाळ चिखलाने भरो!'' असे म्हणत. कोणी जर त्यांना म्हणाले, ''अमक्याला शाप द्या, त्याचे निःसंतान होवो म्हणा.'' तर पैगंबर मुहम्मद (स.) म्हणत, ''मानवजातीला शाप देण्यासाठी नाही आलो. दया व प्रेम देण्यासाठी अल्लाहने मला पाठविले आहे.'' कोणी आजारी असला तर त्याला भेटायला जात, धीर देत. वाटेत प्रेतयात्रा दिसली की लगेच त्यात सामील होत. मग गरिबाची असो की श्रीमंताची. ते समतेचे भोक्ते. त्यांनी एका गुलामाला मुक्त करून त्याचे लग्न एका खानदानी स्त्रीशी करून दिले होते. स्त्रियांची, गुलामांची स्थिती त्यांनी किती सुधारली. ते स्वतः सर्वांना स्वतंत्र करीत. उदाहरणाने शिकवीत. ते गरिबीत आनंद मानीत. ते स्वतः स्वतःचे नोकर होते. स्वतःचे कपडे शिवीत, जोडे शिवीत. घरात चूलही पेटवीत. दुसऱ्यांचीही दुधे काढून देत. कोणतेही काम त्यांना कमी वाटत नसे. एकदा त्यांच्याकडे एक पाहुणा आला होता. तो रात्री इतके जेवला की सांगता सोय नाही आणि मग रात्री त्याचे पोट बिघडले. पहाटे गुपचूप लाजेने निघून गेला. मुहम्मद (स.) सकाळी पाहुण्यांकडे येतात

तो खोलीत पाहुणे नाहीत! खोलीत सारी घाण. मुहम्मद (स.) यांनी सारे जाणले. ते सारे कपडे घेऊन झऱ्यावर ते धुवायला गेले. परंतु तो पाहुणा आपली तलवार न्यायची विसरला. तो परत आला, परंतु मुहम्मद (स.) कोठे आहेत? तो पाहुणा गावातील मंडळींसह पैगंबरांना शोधीत त्या झऱ्याकाठी आला. तो ते उदात्त दृश्य! मुहम्मद (स.) कपडे धूत आहेत. मानवाचे पाप धुवायला आलेला महापुरुष ती घाणेरडी वस्त्रे धूत होता. पाहुणा लाजला!

स्वावलंबनाचे ते भोक्ते. श्रमाने मिळवावे व खावे असे त्यांना वाटे. भीक मागणे त्यांना पसंत नसे. प्रत्येकाला पोटभर अन्न, अंगभर वस्त्र मिळालेच पाहिजे. त्यासाठी मनुष्याने श्रमाने व समाजाने त्याला द्यावे. एकदा एक धट्टाकट्टा मनुष्य भीक मागत होता. पैगंबर म्हणाले,

"तू भीक का मागतोस?"

"माझ्याजवळ काही नाही." तो म्हणाला.

"हातातील हा नक्षीदार कटोरा आहे ना?"

"त्याचे काय करू."

"मी तो विकतो कोणाला तरी. आण इकडे."

मुहम्मद (स.) यांनी तो कटोरा विकला. त्याच्या पैशाने त्या भिकाऱ्याला त्यांनी एक कुऱ्हाड घेऊन दिली व ते म्हणाले,

"जा पहाडात. लाकडे तोड. मोळी आण व वीक. पैसे येतील ते माझ्याजवळ दे."

तो भिकारी जंगलात गेला. भलीमोठी मोळी घेऊन आला. मुहम्मद (स.) यांनी ती विकली. जे पैसे आले त्यातून त्याला खाण्यापुरते देऊन बाकीचे स्वत:जवळ त्यांनी ठेवले. एक महिना याप्रमाणे झाले. महिनाअखेर मुहम्मद (स.) म्हणाले,

"हे बघ तुझे शिल्लक पैसे. यातून कपडे घे आणि असाच श्रमाने जगत जा. समजलास ना?"

ते कर्मयोगी होते. कोणतेही काम त्यांना कमीपणाचे वाटत नसे. त्यांना गुरेढोरे चारणे फार आवडे आणि गुरांवर तरी प्रेम किती! 'वेळच्या वेळी पाणी पाजा. शक्तीबाहेर मुक्या प्राण्यापासून काम घेऊ नका.' अशी त्यांची शिकवण आहे.

पशुपक्ष्यांविषयी त्यांना प्रेम वाटे. एकाने घरट्यातून पिले चोरून आणली. ती पक्षीण घिरट्या घालीत येत होती. तो गृहस्थ पिले घेऊन, मुहम्मद (स.) यांच्याकडे आला. पैगंबर म्हणाले,

"ती पिले त्या चादरीवर ठेव."

त्याने तसे केले. ती पक्षीन प्रेमाने झळवून तेथे एकदम आली. पैगंबर म्हणाले,

"पाहा हे प्रेम. ईश्वराचे याहूनही अधिक प्रेम सर्वांवर आहे. जा, ही पिले पुन्हा त्या घरट्यात नेऊन ठेव."

असे हे प्रेमधर्मी मुहम्मद (स.) होते. जे अनाथ, परित्यक्त असत त्यांना कोणी नसे, जे दुःखी व रंजले-गांजलेले असत ते मुहम्मद (स.) जवळ येत, दुःखे सांगत. मुहम्मद (स.) त्यांच्याजवळ बसत, बोलत, चौकशी करीत. बायका आपल्या निर्दय पतींच्या तक्रारी घेऊन येत. अगदी गरीब गुलामही त्यांच्याकडे येत व त्यांचा हात धरून त्यांना आपल्या धन्याकडे नेत व म्हणत,

"सांगा, या आमच्या मालकांना दोन शब्द. आम्हाला नीट वागवायला सांगा, मुक्त करायला सांगा."

गरीब झोपड्यांतून ते जायचे. सर्वांची विचारपूस करायचे. सर्वांचे अश्रू पुसायचे, जवळ असेल ते द्यायचे.

दिव्यभव्य जीवन

मुहम्मद (स.) यांचा मुख्य आहार खजूर व पाणी हा असे. मिळाली तर बार्लीची भाकरी. त्यांची चैन म्हणजे दूध व मध; परंतु त्यातही संयम राखीत. माननीय अबू हुरैरा (रजि.) सांगतात की पुष्कळ वेळा पैगंबरांना उपाशी राहावे लागे. कधी कधी कित्येक दिवस घरात चूल पेटलेली दिसत नसे. अशा वेळेस ते खजूर व पाणी यावरच राहात. मुस्लिम इतिहासकार लिहितात, "अल्लाहने जगातील खजिन्यांची किल्ली मुहम्मद (स.) यांच्यासमोर ठेवली; परंतु त्यांनी ती नाकारली."

विरक्त त्यागमय जीवन. गरिबीत आनंद मानणारे जीवन. दारिद्र्य हा माझा अभिमान आहे असे ते म्हणत, "अल्लाह, मला गरीब ठेव." अशी प्रार्थना करीत. "मला गरीब राहू दे, गरीब मरू दे, गरिबीत वाढू दे" म्हणत. एकदा एक मनुष्य पैगंबरांना म्हणाला, "अल्लाहची शपथ, माझे तुमच्यावर फार प्रेम आहे."

पैगंबर म्हणाले, "जर माझ्यावर तुझे खरे प्रेम असेल, तर मग दारिद्र्याचे चिलखत तयार कर. दारिद्र्याने नट. नदी समुद्राकडे धावत जाते. तिच्यापेक्षाही अधिक जलदीने गरिबी त्याच्याकडे धावत जाते जो माझ्यावर प्रेम करतो. गरिबांना तुझ्याकडे येऊ दे, म्हणजे ईश्वराजवळ जाता येईल. तू गरिबांना जवळ घेशील तर ईश्वर तुला जवळ घेईल."

गरिबीने राहावे, साधेपणाने राहावे अशी त्यांची शेकडो वचने आहेत. "तुम्ही गरिबांना व गरजवंतांना समाधान द्याल त्यात माझे समाधान आले. ऐषआरामापासून, सुखासीन जीवनापासून दूर राहा. ईश्वराचे जे खास सेवक आहेत, जे खुदाई खिदमतगार आहेत त्यांना ऐषआरामी राहून सच्ची पूजा करता येणार नाही." असे ते सांगत. एकदा पैगंबरांकडे पाहुणा आला तर त्यांना पीठ उसने आणावे लागले! गरिबीचे व्रत त्यांनी अक्षरशः पाळले. ते गरिबांशी एकरूप झाले. ते मृत्यू पावले तेव्हा काही हत्यारे, एक उंट व लहानशी जागा हीच काय ती त्यांची धनदौलत मागे होती. त्यांचे चिलखतही एका सावकाराकडे गहाण होते. ते सोडवायला पैसे नव्हते!

मुहम्मद (स.) यांची मुलगी माननीय फातिमा (रजि.) यांना स्वतः दळावे लागे. हातांना त्यांच्या फोड येत. एकदा त्या पैगंबरांना म्हणाल्या, "मला मदतीला एक गुलाम द्या."

प्रेमळ पिता म्हणाले, "नोकरांपेक्षा अल्लाहचे नाव घेत जा ते अधिक बरे!"

स्तुती त्यांना आवडत नसे. "मी ईश्वराचा सेवक आहे, त्याचा दूत आहे." असे ते म्हणत.

एकदा आएशा (रजि.) यांनी विचारले, "प्रभूच्या कृपेशिवाय स्वर्गात कोणालाच जाता येत नाही का?"

"नाही, नाही, नाही." त्रिवार म्हणाले.

"तुमच्या गुणांमुळे तुम्हालाही प्रवेश नाही का मिळणार?"

"नाही. ईश्वराची कृपा झाल्याशिवाय माझाही स्वर्गात प्रवेश नाही. तो मला कृपावस्त्राने झाकील तरच मी स्वर्गात जाऊ शकेन."

प्रार्थना हे त्यांचे जीवन होते. ते म्हणत, "किती चुका झाल्या असतील! रोज हजार वेळा मला प्रार्थना करू दे. प्रभुची क्षमा मागू दे."

अशी निस्सीम निरहंकारता त्यांच्या ठायी होती. ते म्हणत, "कुरआन अल्लाहचे आहे. ती माझी वाणी नाही. माझ्याद्वारे तो बोलत आहे."

कुरआनात काही काही ठिकाणी खरेच अपार स्फूर्ती वाटते; परंतु जेथे कायदेकानून आले आहेत, रोजच्या जीवनात कसे वागावे याचे नियम आले आहेत, तेथेही ते संस्फूर्त असत का? त्यांच्या कार्याचे क्षेत्र जसजसे वाढले तसतसे शिकवणीचे क्षेत्र व्यापक करावे लागले. ते पैगंबर होते, आता राष्ट्रस्थापक झाले. राष्ट्रस्थापक या नात्याने त्यांना अनेक नीतिनियम, कायदे द्यावे लागले; परंतु ते फसवणूक नव्हते करीत. अल्लाहची स्फूर्ती व प्रेरणाच मला विचार देते, असे त्यांना वाटत असे. ते स्वत: नि:स्वार्थी होते, त्यामुळे आपण अल्लाहच्या हातातील आहोत असे त्यांना वाटे, केवळ मुत्सद्देगिरीने, लोकांनी विश्वास ठेवावा म्हणून अल्लाहने असा आदेश दिला, असे विचार वदविले, असे नव्हते ते करीत. असे दांभिक ते असते तर आज दीड हजार वर्षे त्यांचे जीवन स्फूर्ती देत राहिले नसते. दुसऱ्याच्या धर्माविषयी अभ्यास करताना अत्यंत आपुलकीची भावना हवी.

१९३२ साली धुळे तुरुंगात आम्ही होतो. कोणीतरी पू. विनोबाजींना प्रश्न केला, "मुहम्मद (स.) यांनी किती लग्ने केली? सात वर्षांच्या मुलीसोबतही."

विनोबाजी गंभीर झाले. डोळे चमकले. "थोरांच्या लग्नाला पुष्कळ वेळा पालक होणे एवढाच अर्थ होतो. मुहम्मद (स.) यांना का तुम्ही भोगी समजता? ते असे असते तर दुनिया त्यांना जिंकता आली नसती. गिबन, कार्लाईल वगैरे महान पंडितांनी त्यांची

स्तुतिस्तोत्रे गायिली नसती. पैगंबर महापुरुष होते. थोर विभूती होते. त्यांचे चरित्र डोळ्यांसमोर आले तर माझी समाधी लागायची पाळी येते!''

विनोबाजींचे ते कातर सकंप भावभक्तीने भरलेले शब्द माझ्या कानात घुमत आहेत. पैगंबरांच्या चरित्राने समाधी लागेल? होय, खरेच लागेल! ते दिव्य, भव्य जीवन आहे, अलोट श्रद्धेचे, त्यागाचे, क्षमेचे, धैर्याचे संस्फूर्त जीवन आहे. प्रेमळ निरहंकारी जीवन!

गुलामाने जेवायला बोलावले तरी जात. रस्त्यात कोणी भेटला तर हातात हात देत आणि त्याने आपला हात काढून घेतल्यावर आपला हात मागे घेत, परंतु ते आपण होऊन प्रथम आपला हात आधी मागे घेत नसत. त्यांचा हात अत्यंत उदार होता. त्यांची वाणी अती मधुर होती. त्यांच्याकडे जे जे पाहात त्यांचे हृदय पूज्यतेने भरून येई. जे जवळ येत ते प्रेम करू लागत. लोक वर्णन करताना म्हणत, "असा पूर्वी कधी पाहिला नाही, पुढे असा दिसणार नाही!''

किती विशुद्ध, प्रेमळ, परंतु शौर्यधैर्याने संपन्न! अरब लेखकांना, अब्दुल्लाहच्या या मुलाच्या गुणांचे वर्णन करताना धन्यता वाटते. हृदयाचे बुद्धीचे हे थोर गुण स्तविताना परम कृतार्थता व अभिमानही वाटतो.

जे प्रतिष्ठित व मोठे असत त्यांच्याजवळ ते सभ्यतेने वागत. गरिबांजवळ प्रेमाने वागत. उद्धट लोकांशी धीरोदात्तपणे वागत. हृदयातील त्यांची उदारता मुखावर फुललेली असे. त्यांना अक्षरज्ञान नव्हते, परंतु निसर्गाचा महान ग्रंथ त्यांनी नीट अभ्यासिला होता. त्यांचे मन वाढते होते, विशाल होते. विश्वात्म्याजवळच्या समरसतेने त्यांचा आत्मा जागृत व उदात्त झालेला होता. पंडित वा अज्ञानी दोघांवरही त्यांचा प्रभाव पडे आणि त्यांच्या तोंडावर एक प्रकारची भव्य दिव्यता दिसे. प्रतिभाशाली विभूतिमत्त्व जणू त्यांच्या अंतर्बाह्य जीवनातून स्रवत होते.

इतरांना ते संस्फूर्त करीत. विभूतिमत्त्वाचे हे लक्षण आहे. नम्रता व दयाळूपणा, सहनशीलता व स्वसुखनिरपेक्षता, औदार्य व निरहंकारवृत्ती त्यांच्या वर्तनात भरलेली होती. सर्वांचे प्रेम ते आकर्षून घेत. जेवायला बसताना अल्लाहचे आभार मानल्याशिवाय, त्याची कृपा भाकल्याशिवाय राहत नसत. आभार मानल्याशिवाय भोजन करून उठत नसत. दिवसा जेव्हा प्रार्थनेत मग्न नसतील तेव्हा पाहुण्यांच्या भेटी, मुलाखती घेत. सार्वजनिक कामकाज बघत.

फार झोपत नसत. बहुतेक वेळा प्रार्थनेत दवडीत, प्रार्थना त्यांचा प्राण होता. "झोपेपेक्षा प्रार्थना बरी," असे ते नेहमी म्हणत. कट्टर शत्रूजवळही त्यांचे वर्तन उदार व दिलदार असे, त्यांनी सूड कधीच घेतला नाही. राष्ट्राच्या शत्रूच्या बाबतीत अती झाले म्हणजे ते कठोर होत. त्या प्रेमसिंधूला परिस्थितीमुळे कठोर व्हावे लागे. वास्तविक त्यांचे जीवन प्रार्थनामय होते, प्रभुमय होते. साधा आहार, झोपायला कठीण चटई, फाटके कपडे व तुटलेल्या वहाणा शिवणे! ते वैराग्य, ती अनासक्ती, ती क्षमा, ती ईश्वरार्पणता ते हिमालयाचे धैर्य, ती समुद्राची गंभीरता, ती निरपेक्ष दया, ती सरळता, कोठे पाहाल हे गुण? समुद्राच्या तळाशी मोठे मोती सापडतात. महात्म्याजवळच असे गुण आढळतात.

त्यांचे मन अर्वाचीन होते. ते बुद्धिप्रधान होते, प्रगतीशील होते. नवीन कल्पना घेणारे व्यापक मन होते. संकुचितपणा त्यांना माहीत नव्हता. मानवी जीवन म्हणजे उत्तरोत्तर विकासार्थ अमर धडपड!ते नेहमी म्हणत, "सतत प्रयत्नाशिवाय मनुष्य जगू शकणार नाही. प्रयत्न माझे काम, फळ प्रभुहाती." कुरआनात प्रभु एके ठिकाणी सांगतो, "तुम्ही स्वत:ची बदलण्याची धडपड सुरू करा. मग प्रभु धावेल."

मुहम्मद (स.) यांनी ज्या विश्वाची कल्पना दिली, तीत गोंधळ नाही. त्या विश्वात व्यवस्था आहे. विश्वातीत व विश्वव्यापी चैतन्य या विश्वाचे नियमन करीत आहे. मुहम्मद (स.) एकदा म्हणाले, "प्रत्येक वस्तू कालानुरूप आहे. काल एक वस्तू अनुरूप असेल ती उद्या असेल असे नाही. अल्लाह शेवटी योग्य तेच करील."

असे जरी ते म्हणत तरी त्यांनी मनुष्य प्रयत्नाला वाव ठेवला आहे. आपण प्रयत्न करावे. देवाला जे प्रयत्न फुलवायचे, फळवायचे असतील ते फुलवील, फळवील. मानवाला इच्छास्वातंत्र्य, कर्मस्वातंत्र्य, प्रयत्नस्वातंत्र्य आहे.

पैगंबरांची सहानुभूती सर्व भूतमात्रासाठी. त्यांनी सर्व प्राणिमात्रासाठी प्रभुची करुणा भाकिली. 'एका मानवाला वाचविणे म्हणजे सर्व मानवजातीला वाचविणे आहे' असे ते म्हणत. समाजाचे एकीकरण करणारे ते होते. ते जोडणारे होते. अती उच्च, उदात्त असे ते मन होते. तरीही कौटुंबिक जीवनाचे पावित्र्य विसरत नसत. मानवाची सेवा म्हणजेच ईश्वरभक्तीचे परमोच्च कर्म असे त्यांना वाटे.

"आपापली कर्तव्ये सोडा," असे कधीही त्यांनी सांगितले नाही. त्यांची शिकवण सर्वसामान्य मनुष्याला झेपणारी आहे. त्यांचा मर्यादा-धर्म आहे. आपापली नियत कर्तव्ये करण्यातच पुण्य आहे, धर्म आहे.

पैगंबर सांगायचे, "मुलाबाळांची उपेक्षा नका करू. ती प्रभूची ठेव आहे. प्रेमाने व हळुवारपणाने मुलांचे संगोपन करा. मुलांनीही आईबापांना मान द्यावा, प्रेम द्यावे. तुमच्या कर्तव्याच्या वर्तुळात तुमचे कुटुंबीय फक्त नसावेत, आप्तेष्ट सगेसोयरे, मित्र व ज्यांचे तोंड खाली झाले आहे असे अनाथ, त्यांचाही समावेश तुमच्या कर्तव्याच्या वर्तुळात आहे, हे विसरू नका."

असे हे पैगंबर मुहम्मद (स.) होते. त्यांच्याहून अधिक विशुद्ध, अधिक प्रतिभाशाली विभूती झाल्या असतील, परंतु जे ईशकार्य घेऊन मुहम्मद (स.) आले, त्या कार्याचे जितक्या एकरूपतेने व जितक्या धैर्यशौर्याने व उदात्ततेने त्यांनी पूर्तता केली तसे क्वचितच कोणी केले असेल.

ईशसंदेश मला द्यावयाचा आहे, ही अखंड जाणीव ठेवून तदर्थ असे सर्व जीवन क्वचित कोणी दिले असेल. एका महान सत्याला त्यांनी जीवनात स्थान दिले होते. त्या सत्यातून सर्व प्रेरणा घेत होते. तो त्यांचा आनंद. ते सत्य म्हणजे अल्लाह एक आहे. हे सत्य त्यांच्याइतके तीव्रतेने कोणीही दिले नाही. त्यांचा अनंत उत्साह या सत्यार्थ होता. क्षुद्र गोष्टीसाठी नव्हता. असे महापुरुष हे जगाचे, मानवजातीचे मोठे मीठ असतात. मानवजीवन ते सडू देत नाहीत. स्वच्छ राखतात.

पैगंबर मरण पावले तेव्हा माननीय उमर (रजि.) म्हणाले, "कसे मरण पावले? अशक्य!"

अबू बकर (रजि.) म्हणाले, "मित्रांनो, ज्यांनी मुहम्मद (स.) यांची पूजा केली त्यांनी लक्षात घ्यावे की मुहम्मद (स.) मरण पावले, परंतु ज्यांनी ईश्वराची पूजा केली, त्यांचा अल्लाह सदैव आहे, तो कधी मरत नाही!"

मुहम्मद (स.) गेले, परंतु तो एक अल्लाह सदैव आहे. मुहम्मद (स.) विसरलेत तरी अल्लाह विसरू नका, आणि अल्लाहची स्मृती देणारा, त्याला तरी कोण कसा विसरेल? खरे ना!

(साने गुरुजी यांच्या पुस्तकातील संकलन)

- ० - समाप्त - ० -